# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/03/2023 (मंगळवार) सकाळ


---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा वारेगाव वस्ती कामठी येथे दिनांक १३/०३/२०२३ चे ००.२५ वा. ते ००.५० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, वारेगाव रेती घाट मधुन ट्रकमध्ये विनापरवाना अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथील स्टाफने घटनास्थळी जावुन पेट्रोलिंग दरम्यान ट्रक क्र. एम.एच- ३१/ सीक्यु-६२९२ चा चालक आरोपी हा आपले ट्रकमध्ये रेती घेवुन जात असताना दिसल्याने त्यास गाडी थांबविण्याचा इशारा दिला असतांना ट्रक चालकाने आपला ट्रक न थांबविता भरधाव वेगाने चालवून नेत असतांना त्याचा पाठलाग केला असता काही अंतरावर ट्रक उभा करून चालक ट्रक सोडुन घटनास्थळावरून पळुन गेला. त्याचा पाठलाग केला असता मिळुन आला नाही. घटनास्थळी मिळुन आलेल्या ट्रकची पाहणी केली असता सदर ट्रकमध्ये ०५ ब्रास रेतीने भरलेला ट्रक मिळुन आल्याने ०५ ब्रास रेती किंमती अंदाजे १०,०००/-रू. व ट्रक किंमती अंदाजे ४,००,०००/-रू. असा एकुण वाहनासह ४,१०,०००/-रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे- पोलीस उपनिरीक्षक शरद डोंगरे पो.स्टे. खापरखेडा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन फरार ट्रक चालक आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. कैलास पवार, ब. नं. ११९ मो. नं. ८०८००८८५२८ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. कोंढाळी** :- अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा जामगढ येथे दिनांक १०/३/२३ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे- सौ. उशाताई धम्मरक्षित वाहणे, वय ४७ वर्ष, रा. जामगढ यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे येवुन तोंडी रीपोर्ट दिली की, पाणी पुरवठा विहीरीवरील शासनामार्फत लावलेले सोलार मोटार पंपचे साहीत्य केबल वायर १५० फुट अंदाजे किंमती १५०००/- रू. व एचडीपीइ पाइप ३० मीटर अंदाजे किंमती १००००/- रू. असा एकुण २५०००/- रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. भोजराज तांदुळकर ब. नं. ५०६ मो. क्र. ७७५८८८३०३० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २४ कि.मी. अंतरावरील महालगाव मौदा येथे दिनांक १०/०३/२०२३ चे २०.०० वा. ते दि. ११/०३/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संजयसिंग श्रीओंकारसिंग सेंगर, वय ३८ वर्ष रा. असोली ता. कामठी हा मारूती सुझुकी कंपनीत ॲडमीनचे काम करतो व तीन ते चार महीन्या अगोदर फिर्यादी याला कंपनीने मारूती इको गाडी क्र. HR-87/J –2950 ही वापरण्या करीता दिली असुन दि. १०/०३/२०२३ रात्री ०८.०० वा. दरम्यान गाडी ही आसोली येथे गेस्ट हाउस येथे लावली व फिर्यादी त्याच्या रूमवर जेवन करून झोपी गेले नंतर दि. ११/०३/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. दरम्यान कामाला जाण्याकरीता उठुन गाडी जवळ जावुन गाडी चालु करून पाहीली असता गाडीचा सायलेंसर नव्हता. कोणीतरी अज्ञात चोराने सायलेन्सर किंमती अंदाजे २०,०००/— रू काढुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार यंगलवार ११७४ मो. नं ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**